E-Paper: www.vidharbhsatyajeet.in

RNI-MAHMAR-2023/88726

दैनिक विदर्भ सत्यजीत

LIVE NEWS

प्रमुख मार्गदर्शक शौकत भाई शेख | मुख्य संपादक :- उध्दव श्रीराम फंगाळ मो.9511446111/9921746611 | कार्यकारी संपादक योगेश सौभागे

बुलढाणा. वर्ष ३ रे ,अंक १२३ वा, वार शनिवार २२ नोव्हेंबर २०२५ पाने ४ किंमत ४ रुपये

# जनतेच्या हक्कासाठी लढणारा, विकासाचा चेहरा; कासमभाई गवळी



## जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद; मतदारांकडून मिळतोय 'विजयी भव' चा आशीर्वाद




मेहकर, प्रतिनिधी मेहकर शहरात नगरपरिषदेच्या निवडणूकीची रणधुमाळी सुरू आहे. त्यामध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे उमेदवार कासम पिरु गवळी जनता-जनार्धनाच्या मनामनात असल्यामुळे त्यांना शहरात वाढता पाठिंबा मिळत आहे. त्याला कारणही तसेच आहे. समाजासाठी काहीतरी करावं अशी अनेकांची इच्छा ही निवडणूकच्या तोंडावर पुरका फुटत असतो. एरव्ही सर्वसामान्य माणसांचे या नवख्या लोकांना काही घेणे देणे नसते. मात्र, सगळ्या गोष्टीला अपवाद ठरलेले आहेत ते म्हणजे कॉग्रेसपक्षाचे निष्ठावंत सहकारी कासमभाई गवळी.कासमभाई गवळी यांची समाजसेवा लौकिक असून जनमनामध्ये दृढ विश्वासात्मक आहे. कासमभाई यांना समतेचे आणि समरसतेचे चांगले भान असल्याने ते सातत्याने जनतेच्या हितासाठी त्यांची सेवा करण्यासाठी नेहमीच धडपड असते. कोण गरीब आहे की श्रीमंत यांचा भेदभाव न करता कासमभाई गवळी प्रत्येक जातीधर्माच्या लोकांच्या सुखदु:खात सहभागी होऊन त्यांना मदतीचा आधार देण्याचे काम करीत असतात. जनहितासाठी ते सातत्याने स्वतःला झोकून देतात. गोरगरीब, निराधार, वंचितांच्या सेवेसाठी कासमभाई प्रत्येकांच्या मदतीला धावून येतात म्हणूनच कासमभाई गवळी मेहकर शहरात आपल्या हक्काचा माणूस म्हणून जनसामान्यांत त्यांची प्रतिमा लौकिक आहे. त्याचं समाजसेवेचा वसा घेऊन त्या विचारांची शिदोरी घेऊन कासमभाई गवळी नगरपरिषदेच्या निवडणूकीत नगराध्यक्ष पदासाठी कॉग्रेसपक्षाच्या पंजा या निशाणीवर निवडणूक लढवित आहेत. त्यांची सर्वसमावेशक वृत्ती लोकाभिमुख आणि विकासाभिमुख समाजसेवा त्यांना विजयाच्या उंबरठ्यावर घेऊन गेली आहे. याअगोदर मेहकर शहरातील प्रत्येक प्रभागात त्यांनी विकासात्मक कामे करुन शहराचा चेहरामोहरा बदललेला आहे. त्यामुळे कासमभाई गवळी आज शहरातील प्रत्येक नागरिकांच्या मनामनात घर करून बसलेले आहेत. त्याचं विकासात्मक कामाची आणि जनतेच्या सेवेची शिदोरी घेऊन कासमभाई गवळी कॉग्रेसपक्षाच्या पंजा या निशाणीवर निवडणूक लढवित असताना, शहरातील प्रत्येक नागरिकांच्या भेटीगाठी घेत असताना त्यांना सर्वजातीधर्माच्या मतदारांकडून भरभरून आशीर्वाद मिळत आहे. तो जनतेच्या उत्स्फूर्त प्रतिसाद पाहून विरोधाकांच्याही भुवया उंचावल्या आहेत. समाजाची निष्ठेने करीत आलेली सेवा आणि कासमभाई गवळी यांना मतदारांकडून भरभरून आशीर्वाद आणि त्यांना वाढता पाठिंबा पाहता या निवडणुकीत कासमभाई गवळी यांची जमेची बाजू आहे एवढे मात्र निश्चित.